सकाळ TODAY

कोल्हापूर, रविवार, २६ ऑक्टोबर २०२५



कोल्हापूर : दसरा चौक येथे मंगळवेढा येथील वारी परिवार सायकल मोहिमेतील कार्यकर्त्यांचे स्वागत करताना पदाधिकारी.

# शाश्वत प्रतिष्ठानतर्फे वारी परिवाराचे स्वागत

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २५ : शाश्वत प्रतिष्ठान कोल्हापूरच्या वतीने मंगळवेढा येथील वारी परिवार सायकल क्लब यांच्यातर्फे शेतकरी राजाच्या सन्मानार्थ आयोजित मंगळवेढा ते पन्हाळगड या सायकल मोहिमेचे दसरा चौक येथे स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सचिवा शुभांगी गावडे यांच्या हस्ते प्रतिष्ठानचे स्मृतिचिन्ह व झाडाचे रोप देऊन स्वागत करण्यात आले. अध्यक्षस्थानी अश्कीन आजरेकर होते.

गावडे म्हणाल्या, 'अशा या मोहिमांमधून समाज प्रबोधनाच्या कार्याबरोबरच इतिहास आणि निसर्ग संवर्धनाचे कार्य साधले जाते, अशा स्तुत्य उपक्रमास नेहमीच आपला पाठिंबा राहील,' असे मत व्यक्त केले. यावेळी वारी परिवारचे प्रा. विनायक कलुबर्मे यांनी परिवाराच्या कार्याची माहिती देऊन शाश्वत प्रतिष्ठानच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ गुरुदत्त म्हाडगुत, उपाध्यक्ष राहुल चौधरी, संचालक डॉ. धीरज शिंदे, संतोष परब, सुमित जामसांडेकर, नरेश पांचाळ, राहुल चव्हाण, डॉ. सुनील भोसले, डॉ. प्रदीप पाटील, प्रा. मधुकर पाटील आदी उपस्थित होते.